# यंदाच्या सणांच्या काळासाठी फ्लिपकार्टच्या MarQ तर्फे भारतीय ग्राहकांसाठी अँड्रॉईड ९.० स्मार्ट टीव्हीची श्रेणी सादर

- *३२ इंची आणि ४३ इंची एचडी आणि ४के अल्ट्रा एचडी अशा प्रकारांमधील MarQ स्मार्ट टीव्ही आजपासून फ्लिपकार्टवर उपलब्ध, किंमत ११,९९९ पासून सुरू*
- *अँड्रॉईड ९.० स्मार्ट टीव्हीमध्ये रेटिना-सेफ तंत्रज्ञान, बिल्ट-इन क्रोमकास्ट आणि डॉल्बी ऑडिओमुळे मिळेल कनेक्टेड असल्याचा अस्सल अनुभव*

**बंगळुरु - १८ सप्टेंबर २०२० :** फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने आगामी सणासुदीच्या काळाच्या पार्श्वभूमीवर आज त्यांच्या अँड्रॉईड ९.० ने समर्थित MarQ स्मार्ट टीव्हीच्या सादरीकरणाची घोषणा केली. यामुळे, गेल्या काही वर्षांत वेगाने भारतीय ग्राहकांच्या पसंतीस उतरणाऱ्या या विभागात आता फ्लिपकार्टच्या MarQ ब्रँडने प्रवेश केला आहे. फ्लिपकार्टवर MarQ स्मार्ट टीव्ही ३२ इंची एचडी आणि ४३ इंची फुल एचडी आणि ४के अल्ट्रा एचडी या प्रकारात सादर करण्यात आले आहेत. या टीव्हीजची किंमत ११,९९९ रुपयांपासून सुरू होते.

ओटीटीचा वाढता वापर तसेच इंटरनेटची वाढती उपलब्धता यामुळे भारतातील स्मार्ट टीव्ही बाजारपेठेत प्रचंड वाढ झाली आहे. डीएएन इंडियाने[1] ओटीटी कंटेंटच्या वापरासंदर्भात नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणानुसार, 'बिंज वॉचिंग' भारतात अगदी आघाडीवर आहे, सध्याच्या काळात तर हे प्रमाण फारच वाढले आहे. शिवाय, मिलेनिअल्स आणि जेन झेड दररोज सरासरी चार तासांचा कंटेंट पाहतात. ही गरज लक्षात घेऊन MarQ अँड्रॉईड ९.० स्मार्ट टीव्हीमध्ये अनेक दमदार वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. यातील 'रेटिना-सेफ' तंत्रज्ञानामुळे कोणत्याही प्रेक्षकांच्या डोळ्यांवर कमीतकमी ताण यावा, यासाठी इंटेलिजंट कस्टम ब्राइटनेसची सोय आहे.

इतकेच नाही, MarQ अँड्रॉईड ९.० स्मार्ट टीव्हीमध्ये डिझाइनची नवी वैशिष्ट्ये आहेत. यातील मोहक मेटल रिबन स्टँड अत्यंत कमी जागा व्यापतो आणि त्यामुळे प्रीमिअम आणि सुंदर लुक मिळतो. यातील डॉल्बी ऑडिओमुळे MarQ अँड्रॉईड ९.० स्मार्ट टीव्हीमध्ये आवाजातील कंप एक टक्क्याहूनही कमी आहे (*अनेक टीव्हींमध्ये साधारपणे ७ टक्क्यांपर्यंत कंप जाणवतो*) आणि अगदी मोठ्या आवाजात टीव्ही पाहातानाही अप्रतिम दर्जाचा आवाज ऐकू येतो. त्यामुळे ग्राहकांना मोठा आवाजही कर्कश वाटणार नाही. विनासायास, सहजसोपी कनेक्टिव्हिटी मिळावी यासाठी या टीव्हीमध्ये अधिक चांगले पर्याय देण्यात आले आहेत - एचडी प्रकारात ३ एचडीएमआय आणि २ यूएसबी पोर्ट्स आहेत, तर ४३ इंची अल्ट्रा-एचडी प्रकारात ४ एचडीएमआय आणि ३ यूएसबी पोर्ट्स आहेत.

फ्लिपकार्टच्या प्रायव्हेट ब्रँड्स विभागाचे उपाध्यक्ष देव अय्यर म्हणाले, "*ग्राहकांना सणासुदीच्या काळात अशी नवी उत्पादने हवी असतात जी त्यांच्या जीवनशैलीचे मूल्यवर्धन करतील. स्मार्ट टीव्ही हा असाच एक विभाग आहे जो या काळात ग्राहकांच्या अधिक पसंतीचा असतो, विशेषत: आता बहुतांश ग्राहक घरीच असल्याने हे प्रमाण अधिक आहे. फ्लिपकार्टच्या MarQ ने नेहमीच ग्राहकांच्या गरजा पूर्ण केल्या आहेत आणि स्मार्ट टीव्हीची नवी रेंज सादर करणे म्हणजे या दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल आहे. भारत अधिक स्मार्ट आणि कनेक्टेड जीवनपद्धती अंगिकारत आहे आणि MarQ अँड्रॉईड ९.० स्मार्ट टीव्हीजमुळे त्यांना दर्जा, वैशिष्ट्ये आणि सौंदर्य यात कोणतीही तडजोड न करता परवडणाऱ्या दरातील पर्याय उपलब्ध झाले आहेत.*"

फ्लिपकार्टचे MarQ आपल्या सणासुदीच्या काळातील उत्पादनांना अधिक चालना देत MarQ स्मार्ट होम स्पीकर्सही सादर करत आहे. हे स्पीकर्स भारतातच डिझाइन करून संपूर्ण निर्मितीही भारतात करण्यात आली आहे. MarQ स्मार्ट होम स्पीकर्समध्ये अप्रतिम ऑडिओ आणि बास तसेच वापरकर्त्यांचा अनुभव वृद्धिंगत करण्यासाठीची आवाजाची क्षमता देण्यात आली आहे. हे स्पीकर्स फ्लिपकार्टवर ३,४९९ या शुभारंभाच्या किमतीत उपलब्ध आहेत.

MarQ अँड्रॉईड ९.० स्मार्ट टीव्ही आणि स्मार्ट होम स्पीकर्स घरातील सर्व स्मार्ट उपकरणांना जोडता येतील. त्यामुळे दैनंदिन कामांमधील साहयासाठी हे एक सोयीस्कर आणि एकात्मिक तंत्रज्ञान ठरते.

**या उत्पादनांची काही ठळक वैशिष्ट्ये :**

| MarQ अँड्रॉईड ९.० स्मार्ट टीव्ही | | |
|---|---|---|
| ३२ इंची एचडी प्रकार | ४३ इंची एचडी प्रकार | ४३ इंची अल्ट्रा एचडी प्रकार |
| रेटिना-सेफ तंत्रज्ञान | रेटिना-सेफ तंत्रज्ञान | रेटिना-सेफ तंत्रज्ञान |
| डॉल्बी ऑडिओ सराऊंड साऊंडसह २० वॅट स्पीकर्स (आवाजाचा एकूण कंप १ टक्क्यांहून कमी) | डॉल्बी ऑडिओ सराऊंड साऊंडसह २० वॅट स्पीकर्स (आवाजाचा एकूण कंप १ टक्क्यांहून कमी) | डॉल्बी ऑडिओ सराऊंड साऊंडसह २० वॅट स्पीकर्स (आवाजाचा एकूण कंप १ टक्क्यांहून कमी) |
| कस्टम पिक्चर आणि ऑडिओ ट्युनिंग आणि क्रोमा डिस्प्ले इंजिन | कस्टम पिक्चर आणि ऑडिओ ट्युनिंग आणि क्रोमा डिस्प्ले इंजिन | कस्टम पिक्चर आणि ऑडिओ ट्युनिंग आणि क्रोमा डिस्प्ले इंजिन तसेच विविड प्रो ४के तंत्रज्ञान आणि एचडीआर १० |
| बिल्ट-इन क्रोमकास्ट | बिल्ट-इन क्रोमकास्ट | बिल्ट-इन क्रोमकास्ट |
| | | ड्युअल-बँड वाय-फाय २.४ GHz/5GHz |

| | | |
|---|---|---|
| मीडिया टेक CA53 क्वाड-कोअर प्रोसेसर | मीडिया टेक CA53 क्वाड-कोअर प्रोसेसर | मीडिया टेक CA53 क्वाड-कोअर प्रोसेसर |
| ब्ल्यूटूथ ५.० | ब्ल्यूटूथ ५.० | ब्ल्यूटूथ ५.० |
| Mali 470 GPU | Mali 470 GPU | Mali 470 GPU |
| 1GB RAM/ 8 GB ROM | 1GB RAM/ 8 GB ROM | 1.5GB RAM/ 8 GB ROM |
| ३ एचडीएमआय पोर्ट्स + २ यूएसबी पोर्ट्स | ३ एचडीएमआय पोर्ट्स + २ यूएसबी पोर्ट्स | ४ एचडीएमआय पोर्ट्स + ३ यूएसबी पोर्ट्स |
| MarQ स्मार्ट होम स्पीकर्स, गुगल असिस्टंट समर्थित | | |
| हँड्स-फ्री व्हॉईस-एनेबल्ड अनुभव, हिंदीतही उपलब्ध | | |
| वैयक्तिक ऑर्गनायझर, हवामान आणि ट्रॅफिकची माहिती | | |
| स्पॉटिफाय, यूट्युब म्युझिक आणि ट्यूनइन अशा विविध समर्थित स्ट्रीमिंग ॲप्सवरून संगीताचा आनंद घेता यावा यासाठी ब्ल्यूटूथचा वापर करता येणार तसेच जिओसावन प्रोचे ३ महिन्यांचे सबस्क्रिप्शन मोफत | | |
| या विभागातील सर्वोत्कृष्ट ध्वनी दर्जा आणि दुप्पट वॅटेजसह आवाज येणार, दूरवरचे आवाज ओळखणारे तंत्रज्ञान | | |

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 250 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, PhonePe, India's fastest growing digital payments platform, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more details contact:** media@flipkart.com